तरुण भारत मंगळवार १३ जानेवारी २०१५

# दोडामार्ग कॉलेजच्या युवा महोत्सवाला प्रारंभ

## सांस्कृतिक कार्यक्रम, काव्यसंमेलन, विविध डे व अन्य कार्यक्रमांनी आणली बहार



**दोडामार्ग : महाविद्यालयाच्या महोत्सवात विविध वेशभूषांमध्ये विद्यार्थ्यांनी अशी रंगत आणली.**

वार्ताहर
दोडामार्ग

येथील नवनिर्माण शिक्षण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या वार्षिक नवनिर्माण युवा महोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे हा युवा महोत्सव १६ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

महोत्सवात क्रीडा, शोभायात्रा, काव्यसंमेलन, फन अँन्ड फूड फेस्टिव्हल, प्रश्नमंजुषा, साहित्यिक गप्पा, शेला पागोटे, पारितोषिक वितरण समारंभ व सप्तरंग या विविध कार्यक्रमांसह युवा महोत्सवाला रंगत आली आहे.

महोत्सवाचा प्रारंभ क्रीडा स्पर्धांद्वारे करण्यात आला. उद्घाटक म्हणून स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य सूचन कोरगावकर व प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते. पहिल्याच दिवशी कॅरम, व्हॉलीबॉल, १०० मीटर, २०० मीटर धावणे, उंचउडी, लांबउडी, गोळाफेक, भालाफेक या स्पर्धा घेण्यात आल्या. १० जानेवारी रोजी क्रिकेट, बॅडमिंटन स्पर्धा झाल्या. ११ जानेवारी रोजी ट्रेडिशनल डेनिमित्त शहरातील मुख्य रस्त्यावरून उत्कृष्ट देखाव्यासह शोभायात्रा झाली.

सोमवार १२ रोजी सारी डे, टाय डे, बँगल्स डे, चॉकलेट डे आणि गोंव्यातील सुप्रसिद्ध कवयित्री पौर्णिमा केरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काव्यसंमेलन, १३ रोजी फ्रेंडशिप डे, कॅम्प डे, जिन्स डे, फन अँन्ड फूड फेस्टिव्हल आणि प्रश्नमंजुषा, १४ रोजी लेखक घडताना : या कार्यक्रमात चंद्रकात गवस यांच्याशी साहित्यिक गप्पा, १५ रोजी सांस्कृतिक महोत्सवाची अंतिम निवड तर १६ रोजी सकाळी ९ वाजता फिशपाँड, १० वाजता पारितोषिक वितरण तर दुपारी तीन वाजता 'सप्तरंग' या सांस्कृतिक युवा महोत्सवाचे आयोजन महालक्ष्मी हॉल दोडामार्ग येथे केले आहे.

**१६ जानेवारीपर्यंत महोत्सवाचे आयोजन**

पारितोषिक वितरण समारंभास गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार सचिन परब उपस्थित राहणार आहेत. शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्ष म्हणून प्रा. दिलीप बर्वे व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. प्रशांत ढेपे जबाबदारी पार पाडत आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.